पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / १९६/१९५ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल:, registrar@sus.ac.in eligibility@sus.ac.in
NAAC Accredited-2015 'B' Grade (CGPA 2.62)
पात्रता विभाग



जा.क्र.पुअहोसोविसो/परिपत्रक क्र.९/२०२०-२१/ ११५८ दि.: 22/12/2020

प्रति,
मा.प्राचार्य /संचालक
सर्व संलग्नित पदव्युत्तर महाविद्यालये व विद्यापीठ संकुले
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ वर्षाच्या प्रवेशाबाबत..
संदर्भ : इकडील कार्यालयाचे जा.क्र.सोविसो/पात्रता विभाग/परिपत्रक/२०२०-२१/३९६२ दि.०२/०७/२०२० रोजीचे पत्र.

महोदय,/ महोदया,

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये, शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता प्रथम वर्ष प्रवेश व्यतिरिक्त इतर सर्व वर्गाच्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वर्षात आश्वासित प्रवेश (Carry Forward ) देण्यात यावा असे कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन महाविद्यालयांचे प्राचार्य व विद्यार्थी यांच्या कडून प्रवेश अंतिम करणे बाबत विचारणा होत आहे. याचा विचार करुन,

१) तीन वर्षाच्या अभ्यासक्रमातील जे विद्यार्थी प्रथम वर्ष अनुत्तीर्ण ( कितीही विषय अनुत्तीर्ण असतील तरी ही ) असतील अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षासाठी प्रवेश देण्यात यावा (Carry Forward )
२) तसेच चार वर्षाच्या अभ्यासक्रमातील जे विद्यार्थी प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष अनुत्तीर्ण ( कितीही विषय अनुत्तीर्ण असतील तरी ही ) असतील अशा विद्यार्थ्यांना सदर अभ्यासक्रमाच्या तृतीय/अंतिम वर्षासाठी प्रवेश देण्यात यावा (Carry Forward )
३) अशा विद्यार्थ्यांना अनुत्तीर्ण विषयांच्या परीक्षा विद्यापीठाच्या नियोजनानुसार देणे बंधनकारक राहील ( Back log ) या खेरीज अशा विद्यार्थ्यांचे संपुर्ण निकाल जाहिर केले जाणार नाही.
४) कोव्हीड-१९ चा प्रार्दुभाव विचारात घेता केवळ शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पुरतेच वरीलप्रमाणे आश्वासित प्रवेश (Carry Forward ) मर्यादित राहील.
५) आश्वासित प्रवेश (Carry Forward )ची सुविधा घेणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया व परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया विद्यापीठाने दिलेल्या विहीत वेळेत पूर्ण करावी. तसेच विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया व परीक्षा अर्ज भरण्याची माहिती विद्यापीठाच्या digital portal मध्ये मुदतीत upload करण्यात यावी. या करीता विद्यापीठाकडून कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही. याची नोंद घेण्यात यावी.
६) प्रवेशापासून व परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची संपूर्ण जबाबदारी महाविद्यालयाची राहील.

७) विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या वरील प्रमाणे निर्णयाचे सर्व संबंधीतांनी नोंद घेवून आवश्यक ती कार्यवाही करावी.

तसेच या नंतर कोणतीही प्रवेशासाठी व परीक्षेसाठी कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

(डॉ.वि.भा.घुटे)
प्र.कुलसचिव

प्रत माहितीस्तव व पुढील कार्यवाहीस्तव :

१) परीक्षा व मुल्यमापन मंडळ
२) वित्त व लेखा विभाग
३) एमकेसीएल विभाग